महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७० वे | दिनांक : १५/०६/२०२६ | वार : सोमवार

## उपोषणाने प्रश्न सुटत नाहीत; चर्चेतून मार्ग काढा : मनोज जरांगेंना रोहित पवारांचा सल्ला



**सोलापूर :** राज्यातील शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तील जाचक अटी रद्द करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात पुकारलेल्या 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी रोहित पवार यांचे आंदोलनस्थळी भेट दिली. तसेच रोहित पवारांसोबत त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर चर्चा देखील केली. सरकार शेतकऱ्यांचा आकडा हळू हळू कमी करत असल्याची माहिती पवारांनी जरांगे यांना दिली.

यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, या देशातल्या, या राज्यातल्या बळीराजासाठी आपल्या पांडुरंगाच्या नगरीत संघर्ष सुरू आहे. नक्कीच शेतकऱ्याला न्याय तर मिळालाच पाहिजे. शेतकरी राजा आपला एकवटला आहे. कारण शेतकरी वाचला तर आपण वाचणार आहेत. आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद आहे फक्त थोडा घोळ आहे. तुम्ही कितीही पोटतिडकीने केले तरी त्याला राजकारणच म्हटले जाणार आहे. तुम्ही आमच्या पार्टीत या, असेही जरांगे यांनी रोहित पवारांना म्हटले.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, तुमच्या मागण्या किती मान्य केल्या जातील माहीत नाही. पण शेतकाऱ्यांची लढाई म्हणून याकडे आपण पाहिले पाहिजे. आपण राजकारण करत नसून शेतकऱ्यांसाठी रोहित पवार लढत आहेत. आता मी इथून गेलो की मला म्हणतील मी पवारांचा माणूस आहे. परवा दिवशी रातभर मी देवेंद्र फडणवीसांचा माणूस होतो. आता तिथून सुटून तुमच्या गळ्यात गुतणार आहे. माझी खूप फरफट सुरू आहे. पण माझी एक भूमिका असते जिथे जिथे अन्याय होत असतो तिथे आम्ही जात असतो. बच्चू भाऊ बसले होते तेव्हा देखील आम्ही गेलो होतो. शेतकऱ्यांसाठी आम्ही कायम सोबत आहोत.

मनोज जरांगे म्हणाले, भूमिका शेतकऱ्यांची आहे त्यामुळे आपण त्याला बळ दिले पाहिजे. मला रोहित पवारांनी मला एक जीआर दाखवला. त्यात त्यांनी मला दाखवले की शब्दांचा खेळ कसा असतो. ३ वर्ष मी तेच बघून बेजार झालोय. कोणीकडे काणा आणि कुणीकडे मात्रा हाणतील, कशाचा मेळ नाही. उपोषण करू करू बेजार झालो मी. पुढे बोलताना जरांगे यांनी प्रश्न केला, तुम्हाला उपोषणाला बसायची वेळच नाही आली पाहिजे. मोदी साहेब पवार साहेबांना तांब्या भरून पाणी देते. आणि मग मोदी साहेब एवढा जीव लवतेत तर तुम्ही उपोषणाला बसून कशाला हाडकं मोडून घेता? पवार साहेबांना सांगा एक फोन फिरवा.

पुढे मनोज जरांगे म्हणाले, जर सरकार तुम्हाला चर्चेसाठी बोलवत असेल तर तुम्ही चर्चा करून मार्ग सोडवावा, असे माझे प्रामाणिक मत आहे. नाही ऐकले तर बघू. सध्या चॅनलला पाहिले मी भरणे मामा म्हणाले असे करू तसे करू मग आपण विश्वास ठेऊ. आम्ही पण ठेवला होता. जेव्हा चांगलं काम करत असतील तेव्हा मी चांगलं म्हणत असतो, नाहीतर मी लावत असतो घोडे. त्यामुळे सध्या ते काम करत आहेत म्हणून मी चांगलं म्हणतोय. परत तुम्ही म्हणाल फुटला की काय? चांगलं चालू आहे सध्या आमचं. आपले विखे पाटील साहेब काम करत आहेत, लाड भाऊ आले आहेत. त्यांनी आधी मला घोडे लावले, परत मी त्यांना लावले आता आम्ही पक्के मित्र झालो. सध्या ते दोघे आमच्यासाठी चांगलं काम करत आहेत.

जर सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेणार असतील तर तुम्ही त्यांच्यासोबत जावं. उपोषण करू नका. उपोषण लई बेकार आहे. तुम्हाला आता कळेल. तुम्ही परत दोन महिन्यांनी मला फोन कराल आणि म्हणाल उगाच उपोषणाला बसलो. तुमची तळमळ आहे शेतकऱ्यांसाठी, त्यात काही वाद नाही. पण माझे हाड ठिसुळ झाले आहेत. माझे शिरा सुद्धा हाडकाला लागले आहेत. उपोषण म्हणजे जिवावर बेतण्यासारखा आहे, असा सल्लाही जरांगे यांनी रोहित पवारांना दिला.

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी रोहित पवार यांचे आंदोलनस्थळी भेट दिली. तसेच रोहित पवारांसोबत त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर चर्चा देखील केली. सरकार शेतकऱ्यांचा आकडा हळू हळू कमी करत असल्याची माहिती पवारांनी जरांगे यांना दिली.

यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, या देशातल्या, या राज्यातल्या बळीराजासाठी आपल्या पांडुरंगाच्या नगरीत संघर्ष सुरू आहे. नक्कीच शेतकऱ्याला न्याय तर मिळालाच पाहिजे. शेतकरी राजा आपला एकवटला आहे. कारण शेतकरी वाचला तर आपण वाचणार आहेत.

## बोरीवली-कल्याण थेट लोकलची मागणी; आमदार संजय उपाध्यायांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र



**मुंबई :** मुंबईतील बोरीवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय उपाध्याय यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून बोरीवली रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, बोरीवली स्थानक हे मुंबईतील सर्वाधिक वर्दळीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक असून, येथे दररोज सुमारे ४.५ लाख प्रवासी ये-जा करतात. पंतप्रधान अमृत भारत योजनेअंतर्गत स्थानकाच्या आधुनिकीकरण व पुनर्बांधणीला मंजुरी मिळालेली असल्याने या कामाला गती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय, आमदार उपाध्याय यांनी स्वतंत्र पत्रांद्वारे पश्चिम रेल्वेशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मागण्या रेल्वेमंत्र्यांसमोर मांडल्या. यामध्ये बोरीवली ते चर्चगेटदरम्यान एसी लोकल गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी प्रमुख आहे. वाढत्या प्रवासीसंख्येचा विचार करता एसी लोकल सेवांचा विस्तार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, दहाणू रोड, विरार आणि बोरीवलीदरम्यान धावणाऱ्या मेमू सेवांच्या जागी नव्या लोकल गाड्या सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. मेमू गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता असून, त्यामध्ये जुने रॅक असल्याने प्रकाश कमी पडतो आणि पुरेशी हवा मिळत नाही. नवीन लोकलच्या धर्तीवर गाड्या सुरू केल्यास उपनगरीय प्रवाशांना अधिक सुविधा मिळतील. यासाठी एसी आणि नॉन-एसी डब्यांचा समावेश असलेल्या लोकल गाड्या सुरू करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

आमदारांनी बोरीवली–चर्चगेटदरम्यान अतिरिक्त लोकल फेऱ्या सुरू करण्याची तसेच प्रवाशांच्या सुविधेसाठी रेल्वे संचालनात सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली. नवी मुंबईतील एपीएमसी बाजारपेठ व शैक्षणिक केंद्रांमुळे पश्चिम उपनगरांतील मोठ्या संख्येने व्यापारी आणि विद्यार्थी दररोज नवी मुंबईकडे प्रवास करतात. या प्रवासादरम्यान त्यांना अनेक ठिकाणी लोकल बदलावी लागते. ही गैरसोय दूर करण्यासाठी अंधेरी ते बेलापूर (एसी/नॉन-एसी) लोकल सकाळी ६ वाजल्यापासून सुरू करण्याबरोबरच बोरीवली ते बेलापूर (एसी/नॉन-एसी) लोकल सेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी आमदार संजय उपाध्याय यांनी केली.

पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय जाळ्यावर वाढत असलेल्या ताणाचा विचार करून प्रवासी सुविधांचा विस्तार करण्यात यावा, अशीही त्यांनी मागणी केली. संजय उपाध्याय यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले की, पश्चिम उपनगरांतील नागरिकांना कल्याणला जाण्यासाठी दादर येथे जाऊन लोकल बदलावी लागते. ही समस्या सोडविण्यासाठी बोरीवली–वसई–दिवा मार्गे कल्याणपर्यंत लोकल सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

या सर्व प्रस्तावांवर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरून लाखो दैनंदिन प्रवाशांना अधिक चांगल्या, सुरक्षित आणि सुलभ रेल्वे सेवांचा लाभ मिळू शकेल, अशी विनंती आमदार संजय उपाध्याय यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. यापूर्वी झालेल्या भेटीदरम्यान आमदार उपाध्याय यांनी विलेपार्ले रेल्वे स्थानकावर स्वयंचलित जिने (एस्कलेटर) बसविण्याची मागणी केली होती. त्या मागणीची अंमलबजावणी सुरू झाल्याबद्दल त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ जून २०२६










## दुसरबिड 'मुंडे पॅटर्न' ची दहशत; FDA च्या धास्तीने बाजारपेठेत शुकशुकाट, नागरिकांची तारांबळ



**बुलढाणा (महेश मुंढे) :** दुसरबिड अन्न व औषध प्रशासनाच्या संभाव्य तपासणीच्या भीतीने दुसरबिड परिसरातील व्यापाऱ्यांनी धसका घेतला असून 12 जून रोजी दुपारी बाजारपेठेतील बहुतांश दुकाने अचानक बंद ठेवल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामुळे दूध, किराणा व दैनंदिन गरजेच्या वस्तूंसाठी आलेल्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली."मुंडे पॅटर्न" मुळे व्यापारी धास्तावले: राज्यात भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेला अधिक आक्रमक स्वरूप मिळाल्याची व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या कठोर कारवाईच्या "मुंडे पॅटर्न" ची चर्चा व्यापाऱ्यांमध्ये आहे. या भीतीपोटीच अनेक आस्थापनांनी तत्काळ बंदचा निर्णय घेतल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.दुध डेअरी, किराणा दुकाने, स्वीट मार्ट, हॉटेल्स आणि पानपट्टी अशी सर्वच दुकाने अचानक बंद झाल्याने बाजारपेठेत शुकशुकाट पसरला. पथक येण्याची माहिती मिळताच व्यापाऱ्यांनी तात्काळ शटर डाऊन केल्याची चर्चा आहे. अचानक दुकाने बंद झाल्याने खरेदीसाठी आलेल्या सामान्य नागरिकांची, विशेषत: महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय झाली. दूध, किराणा यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंसाठी नागरिकांना वणवण फिरावे लागले.दरम्यान, प्रत्यक्षात FDA चे पथक आले होते की केवळ अफवेमुळे हा बंद पाळण्यात आला, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मात्र "मुंडे पॅटर्न" च्या दहशतीमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रललंबित मागण्यासाठी घंटानांद आंदोलन



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** एसटी कर्मचाऱ्यांच्या वर्षानुवर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यासाठी शासनाचे लक्ष वेधणार असल्याची माहिती एसटी संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. याविषयी सविस्तर माहिती अशी की सबंध महाराष्ट्रामध्ये वर्षानुवर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यासाठी एसटी कर्मचाऱ्यांचा असंतोष वाढत असून या मागण्या शासनाने त्वरित मागणी कराव्या म्हणून एसटी संघटनेच्या विविध संघटनांनी तीन टप्प्यात आंदोलन छेडणार असल्याचे निवेदन जिंतूर आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांना एका निवेदनाद्वारे निवेदन देऊन इशारा दिला आहे. आपल्या विविध मागण्यात २०१७ पासून वर्ग दोन कनिष्ठ वेतन लागू करा, एसटीचे अस्तित्व टिकण्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करा, मध्यवर्ती कार्यशाळेत नवीन बस बांधणीसाठी चैसिसचा पुरवठा करून स्वमालकीच्या बस बांधणी करा, जन सुरक्षा अधिनियम २०२४ राज्यात लागू करा,महागाई भत्ता एक रकमी तातडीने अदा कर, घर भाड्याचा दर दहा टक्के, वीस टक्के, तीस टक्के करून एक तर्फी अदा करा, २०१६ पासून एकतर्फी कमी करण्यात आलेला वेतन वाढीचा दर तातडीने तीन टक्के करून निश्चित करा, एसटी कामगाराचे वेतन राज्य सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे समान करा, तसेच राज्य सरकारी कर्मचारी प्रमाणे वेतन,भाडे भत्ते व सेवा सुविधा तात्काळ लागू करा आदी प्रलंबित मागण्यासाठी पुढील आंदोलनाचा एल्गार करण्यात आला आहे. १५ जुन रोजी घंटा नांदोलन दुसऱ्या टप्प्यात २२ जून रोजी बुधवार सभा तर २९ जून रोजी धरणे आंदोलन छेडले जाणारा असल्याची माहिती कामगार संघटना अध्यक्ष तळेकर, सचिव अनिल घुगे, तर काँग्रेस अध्यक्ष श्रीनिवास देशमुख, सचिव ज्ञानेश्वर पिंगळे, व कामगार सेना अध्यक्ष रमेश साडे,सचिव सुनील घुगे , तर कास्ट्राईब तालुकाध्यक्ष कमलाकर कनकुटे, सचिव तथागत कांबळे आदींनी निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी मदन मुंडे, संदीप भांबळे, दिगंबर रणबावळे, राहुल लिखे, आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ जून २०२६

## पाखरांचा थवा

पाखरांचा थवा
उडतो जंगल गावा
फळांच्या झाडावरचा
टिपतो रानमेवा

पाखरांचा थवा
रानोमाळ फिरतो
आपल्या पिल्लांसाठी
चोचीत दाणे आणतो

पाखरांचा थवा
उंच उडतो आभाळी
खालून वर पाहता
दिसते जणू रांगोळी

पाखरांचा थवा
खेळतो नदीकिनारी
दमून भूक लागली की
पिकावर घेतो भरारी

पाखरांचा थवा
करतो मौजमस्ती
सायंकाळ होताच
गाठतो आपली वस्ती



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## विनंती करे बाप

येरे येरे पावसा,
वाट तुझी पाहतो.
डोळे माझे शिणले,
का दूर तू राहतो. १

नभात दूर दूर,
दिसत नाही ढग.
विझेल कसे सांग,
काळया मातीचे धग. २

पहिल्या थेंबासाठी,
चातक पाहे वाट.
येऊ दे मेघाराजा,
पावसाची तू लाट. ३

नभाकडे पाहून,
विनंती करे बाप.
पाऊस न पाडता,
करू नको रे ताप. ४

हात जोडून तुला,
लावतो एक झाड
नको घेऊ परीक्षा,
पावसाला तू धाड. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## स्मृतीशेष सिद्राम गंगाराम शिंदे गुरुजी यांच्या स्मृतीदिनानिमित्त सेवापूर्ती सत्कार व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात संपन्न




**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** शहरातील स्मृतीशेष सिद्राम गंगाराम शिंदे गुरुजी यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त वीरशैव संत कक्कया समाज व मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हरियाणा राज्यातील पानिपत येथे भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालय विभागात प्रादेशिक व्यवस्थापक म्हणून सेवा बजावलेले सेवानिवृत्त डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या सेवापूर्ती सत्कारासह गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन रविवारी (ता. १४) रोजी श्रीराम मंगल कार्यालयात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा-लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले होते. सत्कारमूर्ती म्हणून डॉ. शिवाजीराव शिंदे यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राम कांबळे, वीरशैव संत कक्कया समाज धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्तू कटकधोंड, ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शरणाप्पा मुदकण्णा, मनोहर शिंदे, बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखाधिकारी सचिता चव्हाण, मेजर विजयकुमार शिंदे, व्हीव्हीए फाउंडेशनच्या संचालिका रुपाली शिंदे, प्रतिक शिंदे, ऐश्वर्या शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रमोद कुलकर्णी, राम कांबळे, दत्तू कटकधोंड व प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी शासकीय सेवेत राहून प्रामाणिकपणे काम करत समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपल्याचे सांगितले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते डॉ. शिवाजी शिंदे, पत्नी रूपाली शिंदे व कुटुंबीय यांचा मानपत्र, शाल, बुके संपूर्ण आहेर उपचार देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. शिवाजीराव शिंदे म्हणाले, मी ३४ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावून सेवानिवृत्त झालो असलो तरी समाजकार्याची वाटचाल थांबणार नाही. शिक्षकाचा मुलगा असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व मला चांगलेच माहीत आहे. त्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा यापुढेही सातत्याने सुरू राहील. माझ्या परिवारातील सदस्य, नातेवाईक तसेच या सत्कारासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो पिणार ते गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, या उक्तीप्रमाणे मुरूम शहरातील शिंदे गल्लीसारख्या छोट्या परिसरातून पुढे येऊन आई-वडिलांच्या संस्कार, शिस्त आणि परिश्रमाच्या बळावर डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी राष्ट्रीय स्तरावरील जबाबदारीचे पद भूषविले, ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे. स्वतः घडत असताना त्यांनी विद्यार्थ्यांनाही घडविण्याचे कार्य केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून ते नव्या पिढीला प्रेरणा देत आहेत. आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानून आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवावी, कोणत्याही व्यसनापासून दूर राहून शिक्षणाच्या माध्यमातून यश संपादन करावे.वीरशैव संत कककाय्या समाज बांधव व मित्र परिवारामार्फत डॉ. शिंदे व परिवाराचा सत्कार करताना खालील पदाधिकाऱ्यांना बोलवावे. वसंत शिंदे, खंडू शिंदे, गिरजप्पा कावळे, धनराज शिंदे, ज्योतीराम शिंदे, प्रवीण शिंदे, श्रावण कटके, सचिन शिंदे, रेवण कटके, बाबू शिंदे, मधुकर शिंदे, जोतीराम रकमाजी शिंदे, राजेंद्र कटके, वैभव कटके, अमोल कटके, सुलोचना शिंदे, जयश्री कावळे, महादेवी शिंदे, रेशमा शिंदे, साक्षी शिंदे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कमलाकर मोटे यांनी केले. संतोष पवार यांनी सूत्रसंचालन तर गंगाधर शिंदे यांनी आभार मानले. यावेळी दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षण, संस्कार आणि समाजसेवेचा संदेश देणारा हा प्रेरणादायी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक व विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील श्रीराम मंगल कार्यालयात आयोजित सेवापूर्ती सोहळ्यात डॉ. शिवाजी शिंदे, रूपालीताई शिंदे यांचा सत्कार ज्ञानराज चौगुले, शरणाप्पा मुदकण्णा, महेश मोटे यांच्या हस्ते मानपत्र व सत्कार करताना दत्तू कटकधोंड, मनोहर शिंदे, सचिता चव्हाण, विजयकुमार शिंदे व अन्य.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ जून २०२६

# सांगावा - अस्सल ग्रामीण वास्तवाचे चित्रण




शतकोत्तरी दशकात मराठी साहित्यातील जी ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारे कथाकार कादंबरीकार आपल्याला प्रादेशिक्तेनुसार दमदार अभिव्यक्तीने लेखन करणारे एक सिद्धहस्त लेखक सचिन पाटील यांच्या 'सांगावा'या कथेचा कथानूबंध म्हणजे अस्सल ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी कथा.आई वडीलांच्या चरणी अर्पण पत्रिका करून सचिन पाटील यांचे सांगावा, अवकाळी विळखा,व 'गावठी गिच्चा'असे कथासंग्रह आले.कथाकार म्हणून 'सांगावा'ने नावं लौकिक दिला.प्रस्तूत बारा कथेत 'भूल',रानाला पडते.एखादं सालंचंदीअशी काय पिकं घेऊन येते की त्या रानाला भूल पडते.हे असा अवकाळी उस येतो की,रानभर उलथून पडतो.त्याची गंडूरी चार पाच पडते,वांगे असे डफळता की, साऱ्या रानाला भूल पडते.पण ज्यांच्या रानाला अशी भूल पडली त्या घरात काहीतरी आक्रीत घडतं.हे आक्रीत घडू नये म्हणून या कथेचा नायक हणमा म्हणतो "उगचं भूल पडाय नगो आमच्या रानाला म्हणून!"(पृ.२७) झाकडात उठून सारं वांग्याचं रानं उपटून टाकतो.ही भूल त्याला पडते.गावखेड्यातील अंधश्रद्धा व त्या विषयी गावात लोक कशी अफवा पसरवता आणि इतरांचं कसं नुकसान होईल.या घाणेरड्या विचारांवर प्रखर टिका करणारी कथा आहे.'काळीज' रानं काळीज होते आहे.पण सेज मध्ये जमिनी गेल्या पण जुन्या कास्तकारांचे कुणब्यांचे काळीज टिचले.एक भळभळणारी जखम घेऊन ही माणसं भयगंन्नती झाली.रानाचे तुकडे झाले, खाणारे वाटेकरी झाले.हाताला काम मिळेना,बेकारी वाढली.सावकारी टुकारी वाढली.पुर्वीचा सुखी प्रदेश दु:खी झाला.काळी आई रुसली.पिकाऊ जमिन पडीक ओसाड झाली.इथली सजीव माती निर्जीव झाली.(पृ.२८)हे वर्णन मन पिळवटून टाकते.ज्या बापजाद्यानं उभी हयात मातीत घातली.तिच जमिनीवर सेज आलं अन् मायमातीचं काळीज चिरलं.पैस मिळालं सिमेंटचं घर झालं पण यायचं काळीज गेलं.शेती.नवी क्रांती,मशीनरी, उद्योगधंदे,.पॉलिहाऊस,ग्रिनहाऊस, असं नवं कायनुबायनू आलं.या कथेचा आत्मा म्हतारा शामुआण्णा वेडगळ झाला.'पावना'ही कथा मनात घर करून राहते.दारुडे पाहुणे रातचे इरातचे कुणाचबी पावन म्हणून घर विचारीत येतात.या कथेत असाच मी धुळगावाचा तुमचा मेव्हणा.एसटी चुकली म्हुणं आलो.तातोबा त्याच्यावर विश्वास ठेवत नाही.हा नक्की बैल चोरायला आलाय.पण सरपटणाऱ्या जनावरागत रात्र निघून जाते."छपरातलं कुदळ,फावडं,कासरं,वडणी,इळं,कोयतं, असं सगळं सामान जिथल्या तिथं असल्याची खात्री केली.पावना न सांगता-सवरता बीन चहा पाण्याचा गेला"(पृ.५१)अशी ही बनवाबनवी करणारी दारखंडी लोकं या खिंडीतून पावना होता पण झाकडात निघून गेला.'मांडवझळ' या कथेत लाली नावाच्या पाळीव जीवाचं भूकेचं वेदना मांडलं आहे.भूक ही किती भयाण असते.ती मुकण्याची असो की,सुक्याची.लालीला दारपासनं बांधली होती."अन्नाच्या आशेनं पंगतीत घुसली.हावरटासारखं तिनं एका खरकट्या ताटात तोंड घातलं.भूकेलेली लाली अन्नावर तुटून पडली इतक्यात मांडवात एकच दंगा उसळला.कुणीतरी जोरात ओरडलं"आला राऽकुत्रं,ये हाडऽकाठी घे अरं दगूड घाला रे कुत्र्याला ऽ..!(पृ.६०)भरल्या मांडवातील एका भूकेच चित्रण सचिन पाटील अतिशय सृजनशील तेथे चित्रित करतात.माणूस झाला म्हणून काय तोही डखाळचं असतो की,इथं प्रमाणिक मुकण्याची भूक ही माणसं ओळखत नाही.या 'मांडवझळ'अतिशय वेधक वेदना मुखर करते.'वाट'ही वहिवाट झाली तर चांगली.वाट खडतर, बिकट वाट,वाट. वाट लावणारी.या कथेत पांडबा शेतकरी.उस कारखान्यात जावं म्हणून हेलपाटे घालून दमला.सिलिपबाय,तोडकरी, मुकादम यांची हजीहजीची हजामत करूनही ऊस फडात वाळून चाल्ला.ऊस गेला म्हणजी पोरीचं लग्न करता येईल.शेवटी थोडीफार चिरीमिरी देऊन हा मुकादम राजी होतो.पण तो म्हणतो उभा ऊस पेटून द्यावं लागलं तेव्हाच आम्ही ऊसतोडायला हात लावू.बापू नारळ अगरबत्ती घेऊन येतो.मुकादमाच्या हातात काडीपेटी देतो.पण मुकादम म्हणतो मालकांनं पेटून द्या नाहीतर चला रे, दुसऱ्या थळात जाऊ.शेवट पांडवा आपल्या हातानं ऊसाला काडी लावून देतो.जणू आपल्या पोटच्या लेकराला आपण अगीनडावदिला."आपल्या पोटच्या पोरालाचं आगीनं विळखा घातलाय आणि ते ओरडतंयऽआपल्याला मदतीसाठी बोलवतयऽ...(पृ.७५) साऱ्या ऊसाची वाट लागली.अन् तसंच दु:खी मनानं घराची वाट धरतो.ही शेतकऱ्यांची सखेद वेदनेना देणारी कथा.'धग' हिच धग कुणब्यांचा वग घेऊन येते अन् जणू जीवाचा मग मागते हे वास्तव विस्तव होऊन येते तेव्हा ही कथा."बाहेर उनाची धग, वाढलेली,झळा मारणारी, तर दुकानात इस्तरीची धग पोळलेली.अंगाचं पाणी पाणी करणारी अन् संबाच्या पोटात भूकेची आग तितकीच वाढलेली (पृ.८३)इस्तरी दुकानाचा मालक संबाला अरे रावीची भाषा बोलू दम देतो.ही निमशहरी मानवी प्रवृत्तीची कथा इथं माणसाचा स्वभाव प्रपंच रागीट होतं चाललेला.तसेच श्रीमती आणि पैशाचा माज आलेला सामान्य नोकरं मोलमजुरी करणाऱ्याची भावना कुणी समजून घेत नाही.या कथेत ही निसर्ग आणि मानवी मनाची धग ही काययच आहे.'सय'मानवी जीवनात आठवणी मनांत कायम घर करून राहतात.प्राणी असो किंवा मानव 'सय'घेऊन जगला तर सुखी समाधानी राहतो.'रावबा याचा लहान मुलगा सतू त्याच्या मागे लागतो.रात्रीच शेतात जागलीला येण्यासाठी.सतू नको म्हणताना येतोच.त्याला तो गोडीशेव घेऊन देतो तो घरी जातो असा भास पण रावबाला तो सतू जागोजागी त्याला भेटल्याचा भास होतो.तो अनेकांना विचारतो.पण सारेच नाही म्हणतात."आपला मुलगा सतू चार दिवस झालं मामाच्या गावाकडं जत्रेला गेल्याचं त्याला आठविलं.पोराच्या आठवणीनं त्याच्या मनात कालवाकालव झाली.पोराला लय बघू वाटू लागलं"(पृ.९४)हा मानवी मनाचा चकवा आहे.'मरणकळा' वाघमारे सर आपल्या वडिलांच्या आठवणीत व्याकुळ होतात.गावी असलेल्या बापाची सेवा करावी.त्यांनी जीवाचं रानं करून शिकविले.आज आई नाही.आज सकाळ पासूनचं त्याचं मन उद्विग्न होतं तो रजा घेऊन बापाला भेटण्यासाठी निघतो.गावी येतो.तर"किती उशीर केलात सर,दुपार पासून कितीतरी वेळा फोन केला पण तुम्ही तिथे नव्हता.बाबा तुमची आठवण काढून थोड्यावेळापुर्वीच तर."(पृ.१०५)ही समकालीन वास्तवाचीकथा मनाचा चिरकाल उडवून देते.आपण शिकलो पण मायबापा सांभाळू शकत नाही.ही भयंकर खेदाची गोष्ट आहे.मरणकळा भोगणारा बाप मुलाची वाट पाहून मरतो.'चकवा' या कथेत भाज्या आणि माधुरीच्या नितळ निर्लेप प्रेमाचा चकवा आहे.'ओझं' एक नवतरुण रणजित काकडे या गावात सातवीपर्यंत शिकला.त्यांनं गाव सोडून पुढं पुण्याला गेला मोठं इंजिनिअरींगच शिक्षण करुन मोठा साहेब झाला.पण गावाला नाही विसरलो. बाराबलुतेदासाठी त्यांनं शालीचं वाटप केलं अन् बंद पाकिटात पैसं दिलं.या गावाचे उपकाराचे ओझे मला फेडायचे आहे."मनात खोलवर कुठेतरी तुमच्या उपकारचं 'ओझं'आहे या गावपांढरीचं,या मातीचं माझ्यावर जे ॠण आहे ते फेडण्यासाठीचं आज मी इथे आलो आहे "(पृ.१२८)ही एक सृजनशील प्रेरक द्दष्टी देणारी कथा.'बळी' दीन दुबळयांच्या असह्य शरीर वेदनेची ही कथा.आशी ही विकलांग मुलगी.तिच्यावर गावातीलचं असक्या नावाचा नराधम अत्याचार करतो.बळी ही कथा आजच्या समकालीन वास्तवाचे भान उजागर करते.असे नतद्दष्ट सैतान जोपर्यंत आहे.त्यांचा खत्मा होत नाही तोपर्यंत हे निष्पापीतांचे बळी होतंच राहणार.अंतिम शिर्षक कथा 'सांगावा'ही अत्यंत एका निस्सीम मायाळू पाझर देणारी कथा आहे.आज गावं खेड्यातील ऊसतोड मजुरांची होरपळ व तिथं फडावर प्रपंच कष्टाचं काम करणारी जर व्यसनाच्या अजगरी विळख्यात ही अडकली तर मरण घेऊनच ती घरी येतात आणि घरादाराची लेकरा बाळाची दारुड्यामुळे वाताहत होते.सखू म्हतारी या साऱ्या बायकोच्या व्यथा वेदना ऐकून धायमोलून रडते.गावातल्या मारुतीनं ही पोरं घेऊन गेला.येसाबाई म्हातारीला आधार देते."तुज्या पाया पडतेऽऽयेसाबाय तुला जर माझी खरी आगत आसंल.तर माझा एवढा सांगावा सांग माझ्या लेकराला..जसा असचील तसा आताच्या आता निघून ये म्हणावं..!एवढा सांगावा हाय म्हणावं..एवढाच सांगावा हाय म्हणावं..."(पृ.१४५)अशी ही तत्कालीन वसमकालीन वास्तवाचे भान देणारी ही कथा आहे.ख्यातनाम कथाकार योगीराज वाघमारे प्रस्तावनेत लिहितात "सर्वच कथा अत्यंत हृदयस्पर्शी आहेत.कलात्मक आणि चहू अंगाने वैशिष्ट्यपूर्ण आहेत.ती लेखनाने फुलवत जाणारी, जीवाचा वेध घेणारी सचिन पाटीलांची कथा आहे.त्यांची स्वत:ची खास लेखनशैली आहे.ती अनुभवातून आणि निरीक्षणातून आलेली आहे.व्यक्ती, विशेष,स्वभाव वैशिष्टे, बारकावे, भाबडेपणा, तसेच अत्यंतिक जिव्हाळयातून तर कधी परिस्थितीमुळे हतबलता, असहाय्यता,मनात कुढणे,यादी मनुष्य जीवनाचे धागेदोरे कथेत उलगडा होतो.समर्पक शब्दरचना, वाक्प्रचार,म्हणी, प्रसंगानुरूप तयार झालेले क्षण लेखकाने चपखलपणे योजले आहेत.त्यामुळे कसदार कथालेखन झाले आहे (प्रस्तावना) अतिशय चिंतन आशय संपन्न आहे तर पाठराखण डॉ सयाजीराव मोकाशी ते लिहितात "ही कथा संवादातून गती घेत असल्याने आशयाला सकसता येते.भाषेचा मुक्त आविष्कार कथेला लय प्राप्त करून देतो.ठसठशीत प्रसंग निर्मिती.कथांचे प्रसंगानुरूप प्रभावी प्रारंभ.नवा आशय,नेटके व्यक्तिदर्शन व ताकदीचे शेवट हे या कथेला वेगळ्या उंचीवर नेतात.जो कथाकार गेली कित्येक वर्षे अंथरूणावर पडून जिद्दीने अनुभव संपन्न कथा लिहितो.अपघातूनही पुन्हा सावरतो हातात लेखणी घेऊन या व्यवस्थेला सशक्त धडधाकट माणूस नावाच्या वाचकाला स्तिमीत स्तंभित करतो.यातच या कथेचे मोठेपण सामावले आहे.खरोखरच सचिन पाटील हे अक्षर क्रांतीचे सजग योध्दे आहेत.यांनी अनेक माणसं कमविले.मुखपृष्ठ अविनाश पाटील यांनी अतिशय आशय संपन्न केले आहे.माय आपल्या लेकराची आतुरतेने वाट पाहते आहे.सांगावा धाडला आहे.गवळी प्रकाशन इस्लामपूरचेअतिशय उत्तम पुस्तक निर्मिती आहे.

**पुस्तक:-सांगावा (कथासंग्रह)लेखक:-सचिन वसंत पाटील प्रकाशक:-गवळी प्रकाशन, इस्लामपूर मुखपृष्ठ:-अविनाश पाटील, सांगली तृतीय आवृत्ती:-नोव्हेंबर २०१७ किंमत:-२२० रूपयेपुस्तक**



**- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ जून २०२६

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज- डॉ. राजेंद्र बगाटे

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव" ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे ‘वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार’ हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ जून २०२६

# बाप बडा न भैय्या - सबसे बडा रूपय्या

‘करन्सी के साथ देश की प्रतिष्ठा जुडी होती है, जैसे-जैसे करन्सी गिरती है वैसे-वैसे देश की प्रतिष्ठा गिरती है.’ असं वक्तव्य दिवंगत खासदार सुषमा स्वराज यांनी २०१३ मध्ये संसदेत केलं होतं. आज भारतीय रूपयाच्या घसरगुंडीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या वक्तव्याचे प्रकर्षाने स्मरण होते. रुपयाचे अवमूल्यन आणि त्या अनुषंगाने वाढलेल्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडल्याचे दिसून येते. मागील काही महिन्यांपासून उताराला लागलेला रुपया थांबायचे नाव घेत नाही. दोन दिवसांपूर्वी एका डॉलरची किंमत ९५.११ रुपये इतकी नीचांकी नोंदवली गेली होती. आजवरची रुपयाची ही सर्वात मोठी घसरण आहे. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झालं तेव्हा एका डॉलरची किंमत चार रुपये होती. आज ती ९५.११ वर येऊन पोहोचली आहे. २०१२ ते २०२५ या दहा वर्षात रुपया ४८ रुपयांनी कमजोर झाल्याचे स्वतः रिझर्व बँकेने मान्य केले आहे. रूपयाच्या घसरण्याचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असतो. कारण विदेशातून ज्या वस्तू आपण खरेदी करतो त्याचे मूल्य डॉलरमध्ये होत असते. रुपयाची किंमत घसरली की, आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंकरिता अधिक पैसे मोजावे लागते. उदा. डॉलरची किंमत जेव्हा सत्तर रुपये होती तेव्हा शंभर डॉलर किमतीच्या वस्तूकरिता सात हजार रुपये द्यावे लागत होते. आता डॉलरची किंमत ९५ रुपये झाल्याने तितक्याच वस्तू घेण्याकरिता साडे नऊ हजार रुपये मोजावे लागतात. त्यामुळे साहजिकच वस्तूंच्या किमतीमध्ये सुद्धा वाढ होणे स्वाभाविक आहे. रुपयाच्या अवमूल्यनामुळे वाढत असलेली महागाई सर्वसामान्यांसह रिझर्व बँकपुढेही मोठे आव्हान निर्माण करत आहे. महागाईवर नियंत्रण आणण्याकरिता रिझर्व बँकेने व्याजदरात नुकतीच वाढ केली आहे. यामुळे रिझर्व बँकेच्या झोळीत अतिरिक्त पैसा येणार असला तरी सर्वसामान्य कर्जदारांचा खिसा मात्र रिकामा होणार हे स्पष्ट आहे. यासोबतच डॉलर आणि रुपयाचे संतुलन साधण्याची तारेवरची कसरतही रिझर्व बँकेला करावी लागत आहे. याकरिता मोठ्या प्रमाणात स्वतःकडे असलेली विदेशी मुद्रा खर्च करावी लागत आहे. त्यामुळे रिझर्व बँकेच्या जमापुंजीला मोठी खिंडार पडली आहे. रुपया घसरल्याने भारताच्या क्रूड ऑइल (कच्चे तेल) खरेदीवरही विपरीत परिणाम झाला आहे. कारण भारत क्रूड ऑइलची सर्वाधिक आयात करीत असतो. तसेच एल.पी.जि. आणि सि.एन.जि. गॅस सुद्धा आयात करीत असतो, त्यामुळे रुपया जसा-जसा घसरतो तस-तसा या वस्तू खरेदीकरिता अधिक पैसा मोजावा लागतो. त्याचा परिणाम महागाई वाढण्यावर होत असतो. मागील काही दिवसात पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीच्या किमतीमध्ये जी वृद्धी बघत आहोत त्यासाठी अमेरिका-इस्राइल-इराण युद्धाचा परिणाम तर आहेच त्यासोबतच रूपयामध्ये होणारी घसरण हे सुद्धा एक प्रमुख कारण आहे. पेट्रोल डिझेलचे भाव वाढणे म्हणजे वाहतुकीचा खर्च वाढणे, वाहतुकीचा खर्च वाढणे म्हणजे वाहतूक भाड्यात वाढ होणे, पर्यायाने वहन केल्या जाणाऱ्या प्रत्येक वस्तूंच्या किमतीत वाढ होणे. हे साधे अर्थशास्त्रीय समीकरण आहे. बरं भारत फक्त पेट्रोल डिझेल आणि गॅसच आयात करत नाही तर रासायनिक खते आणि खाद्यतेल सुद्धा मोठ्या प्रमाणात आयात करीत असतो. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपया जसा कमकुवत होत जाईल, तसा या वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ नोंदवली जाईल, हे स्पष्ट आहे. (भारत निर्यातीपेक्षा आयात अधिक करत असल्याने ही स्थिति ओढविल्याचे दिसून येते.) त्यातच दिवसेंदिवस रुपयाच्या सुरू असलेल्या घसरणीमुळे शेअर बाजारावर विपरीत परिणाम झाला आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी १.३८ लाख करोड रुपयांचे शेअर्स भारतीय बाजारातून काढून घेतले आहे. तर दुसरीकडे रुपयांच्या तुलनेत डॉलर मजबूत होत असल्याने अमेरिकन बाजारातील गुंतवणुकीत वाढ झाली आहे. इतकच नाही तर ज्या विदेशी बँका व संस्थांकडून भारताने मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले ते कर्ज किंवा त्यावरील व्याज फेडताना आता अधिकचे पैसे मोजावे लागणार आहे. वित्त मंत्रालयाने मार्च २०२६ मध्ये जारी केलेल्या त्रैमासिक अहवालानुसार ऑक्टोबर-डिसेंबर २०२५ या कालावधीपर्यंत भारतावर ७६५.५ बिलियन अमेरिकन डॉलरचे कर्ज आहे. (जि.डी.पी. च्या २० टक्के) तर याच कालावधीत पाकिस्तानवर १३८ बिलियन अमेरिकन डॉलरचे कर्ज आहे. पाकिस्तानचे कर्ज आपल्यापेक्षा कमी दिसत असले तरीही ते जि.डी.पी च्या ४० टक्के म्हणजे भारतापेक्षा प्रचंड आहे. येथे पाकिस्तानची आकडेवारी देण्याचा उद्देश हा की भारतातल्या एका मोठ्या घटकाला आपल्यापेक्षा पाकिस्तानवर अधिक कर्ज आहे, याचा अघोरी आनंद होत असतो. तर आपला शेजारी चीनवर कुठलेच कर्ज नसून उलट त्यानेच जगभरातील साठच्यावर देशांना दीर्घ मुदतीचे कर्ज दिले आहे. प्रत्येक देशाचा एक विदेशी मुद्रा कोष असतो आणि ज्यामध्ये डॉलर पर्याप्त मात्रेत असणे गरजेचे असते. (चार वर्षापूर्वी श्रीलंकेचा हाच कोष रिक्त झाल्याने त्यांच्यावर दिवाळखोरीचे संकट ओढवले होते.) कारण जगभरातील ८० टक्के व्यापार हा डॉलरमधेच होत असतो. विदेशी मुद्रा कोषामध्ये डॉलर मोठ्या प्रमाणात असल्यास त्या देशाचे चलन वधारलेले असते. भारताचा का कोष रिक्त झाला नसला तरीही कमी झाला आहे. अशातच युएस फेडरल रिझर्व बँकेने गुंतवणुकीवरील व्याजदरात वाढ केल्याने गुंतवणूकदारांनी अमेरिकन बाजारातून डॉलर बाहेर काढला नाही. त्यामुळेही बाजारात डॉलरची टंचाई जाणवत आहे. त्यातच रूपयाच्या तुलनेत डॉलर मजबूत झाल्याने विदेशी गुंतवणूकदारांनी स्थानिक बाजारातून पैसा काढून तो अमेरिकन मार्केटमध्ये गुंतविला आहे. त्यामुळे रुपयाची घसरण अधिक झाली आहे. या पार्श्वभूमीवर २० ऑगस्ट २०१३ रोजी गांधीनगर येथील सभेला संबोधित करताना तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री ( विद्यमान प्रधानमंत्री) नरेंद्र मोदी यांनी केलेलं एक वक्तव्य येथे नमूद करावेसे वाटते. ते म्हणाले होते, ‘केंद्र सरकारला अर्थव्यवस्थेशी, महागाईशी आणि घसरणाऱ्या रुपयांशी काही देणे-घेणे नाही, त्यांना केवळ आपली खुर्ची वाचवायची आहे. नेतृत्व जेव्हा दिशाहीन असतं तेव्हा देशाला असे दिवस बघावे लागतात.’ प्रधानमंत्र्यांना स्वतःच्या याच वक्तव्याचे स्मरण शक्य तितक्या लवकर व्हावे अशी अपेक्षा करूया. कारण सगळी सोंगं आणता येतात मात्र पैशाचे सोंग आणता येत नाही. शेवटी एवढच की, ‘बाप बडा न भैय्या, सबसे बडा रूपय्या’

**- डॉ. संतोष डाखरे**

**मो. ८२७५२९१५९६ राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली**

# रक्तदान : सर्वश्रेष्ठ सामाजिक दायित्व

"रक्तदान हे जीवनदान आहे" ही केवळ घोषणा नसून मानवी जीवन वाचविण्याचा सर्वात प्रभावी आणि थेट मार्ग आहे. आधुनिक विज्ञानाने अनेक क्षेत्रांत प्रगती केली असली तरी आजही मानवी रक्ताला कृत्रिम पर्याय उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे एखाद्या रुग्णाला रक्ताची गरज भासल्यास दुसऱ्या व्यक्तीने केलेले रक्तदानच त्याचे प्राण वाचवू शकते. समाजातील प्रत्येक निरोगी व्यक्तीने रक्तदानाचे महत्त्व समजून घेतले आणि नियमित रक्तदान करण्याची सवय लावली, तर अनेकांचे जीवन सुरक्षित होऊ शकते. म्हणूनच रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक दायित्व मानले जाते.आजच्या काळात रस्ते अपघात, शस्त्रक्रिया, कर्करोग, थॅलेसेमिया, हिमोफिलिया यांसारख्या आजारांमुळे तसेच प्रसूतीदरम्यान अनेक रुग्णांना मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तपेढ्यांमध्ये पुरेसा रक्तसाठा उपलब्ध नसल्यास रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होतो. रक्तदान करणारा व्यक्ती अनोळखी असला तरी त्याच्या एका कृतीमुळे दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तीला नवजीवन मिळू शकते. त्यामुळे रक्तदान हे केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीचे प्रतीक आहे.रक्तदानाचे महत्त्व कोरोनाच्या काळात विशेषतः अधोरेखित झाले. लॉकडाऊनमुळे रक्तदान शिबिरे कमी झाली आणि अनेक रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला. अशा वेळी अनेक सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिरे आयोजित केली. त्यांच्या या कार्यामुळे हजारो रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध झाले. यावरून समाजातील संकटाच्या काळात रक्तदान किती आवश्यक ठरते हे स्पष्ट होते.आज अनेक प्रेरणादायी सामाजिक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये युवकांनी वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर आनंदाचे प्रसंग रक्तदान करून साजरे करण्याची परंपरा सुरू केली आहे. काही महाविद्यालयीन विद्यार्थी दरवर्षी नियमित रक्तदान करून इतरांनाही प्रेरणा देतात. अनेक ठिकाणी गणेशोत्सव, शिवजयंती किंवा राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. या उपक्रमांमुळे समाजात रक्तदानाविषयी जागरूकता वाढत आहे.थॅलेसेमिया या आजाराने ग्रस्त असलेल्या मुलांचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे. या मुलांना दर काही आठवड्यांनी रक्ताची आवश्यकता असते. नियमित रक्तदात्यांमुळे त्यांचे जीवन सुरळीत चालते. एका रक्तदात्याच्या योगदानामुळे अशा मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलते आणि त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळतो. त्यामुळे रक्तदान ही केवळ एक वैद्यकीय गरज नसून मानवतेची खरी सेवा आहे.रक्तदानाबाबत समाजात काही गैरसमजदेखील आढळून येतात. रक्तदान केल्याने अशक्तपणा येतो, आरोग्य बिघडते किंवा शरीरात रक्ताची कमतरता निर्माण होते, असे अनेकांना वाटते. प्रत्यक्षात निरोगी व्यक्तीने वैद्यकीय निकषांनुसार केलेले रक्तदान पूर्णपणे सुरक्षित असते. शरीर काही दिवसांत रक्ताची भरपाई करते. उलट रक्तदानामुळे आरोग्य तपासणी होते आणि समाजसेवेचे समाधान मिळते. त्यामुळे या गैरसमजुती दूर करणे आवश्यक आहे.रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अत्यंत व्यापक आहे. रक्तदानामुळे समाजात परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि मानवतेची भावना दृढ होते. रक्तदान करताना जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक स्थिती यांचा कोणताही विचार केला जात नाही. रक्ताचा रंग सर्वांचा एकच असतो आणि मानवतेची भावना सर्वांमध्ये समान असते. त्यामुळे रक्तदान हे सामाजिक ऐक्याचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे उत्तम उदाहरण ठरते.आजच्या डिजिटल युगात रक्तदान अधिक सुलभ झाले आहे. विविध मोबाईल ॲप्स, सामाजिक माध्यमे आणि रक्तदाता गटांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने रक्तदाते उपलब्ध होतात. अनेक तरुण या माध्यमांचा सकारात्मक वापर करून जीव वाचविण्याचे कार्य करत आहेत. आपत्कालीन परिस्थितीत सोशल मीडियावर केलेल्या एका संदेशामुळे काही मिनिटांत आवश्यक रक्त उपलब्ध झाल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात.विद्यार्थी आणि युवकांनी रक्तदान चळवळीत सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि युवक संघटनांनी रक्तदानाविषयी जनजागृती करावी. रक्तदानाचे वैज्ञानिक महत्त्व, त्याची सुरक्षितता आणि सामाजिक उपयुक्तता यांची माहिती दिल्यास अधिकाधिक लोक या चळवळीत सहभागी होतील. "रक्तदान ही सवय, जीवनरक्षणाची हमी" हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.रक्तदान हे केवळ दान नसून जीवनाशी जोडलेले महान कार्य आहे. आपण दिलेल्या रक्ताचा लाभ कोणाला मिळेल हे आपल्याला माहीत नसते, परंतु त्यातून एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचू शकतात, एखाद्या आईचे कुटुंब टिकू शकते किंवा एखाद्या बालकाला नवजीवन मिळू शकते. यापेक्षा मोठे पुण्य आणि समाजसेवा दुसरी कोणती असू शकत नाही.उपसंहार म्हणून असे म्हणता येईल की रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक दायित्व आहे. समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाने नियमित रक्तदान करण्याचा संकल्प केला, तर रक्ताच्या कमतरतेमुळे एकाही व्यक्तीचा जीव जाणार नाही. मानवतेची खरी ओळख संकटात मदतीला धावून जाण्यात असते आणि रक्तदान हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. म्हणूनच प्रत्येकाने "रक्तदान करा, जीवन वाचवा" हा संदेश आत्मसात करून समाजहितासाठी पुढाकार घ्यावा. रक्तदानातूनच संवेदनशील, जबाबदार आणि सशक्त समाजाची निर्मिती होऊ शकते.

**कोट घ्या हे**

“रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्या व्यक्तीला दिलेले जीवनदान आहे. जागतिक रक्तदाता दिनानिमित्त प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करण्याचा संकल्प करावा. मी स्वतः मागील दहा वर्षांपासून शिवजयंती, भीमजयंती आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे आयोजित करून जनजागृती करत आहे. रक्ताला कोणताही कृत्रिम पर्याय नसल्यामुळे प्रत्येक रक्तदात्याचे योगदान अमूल्य आहे. आपल्या एका रक्तदानातून अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे 'रक्तदान करा, जीवन वाचवा' हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे.“

**- लेखक डॉ नामदेव वैजनाथ कचरे**

**भूगोलशास्त्र विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर**